# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२२/M/००११०५**

**अपिलार्थी श्री. सय्यद जबीयोदीन जकीयोद्दीन- बंदी**
**विरुद्ध**
**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक उपमुख्य अधिकारी (पणन)**
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, उपमुख्य अधिकारी(पणन),
कक्ष क्र.२४० पहिला मजला, गृहनिर्माण भवन, मुंबई-४०० ०५१.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी (पणन)**
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, उपमुख्य अधिकारी(पणन),
कक्ष क्र.२४० पहिला मजला, गृहनिर्माण भवन, मुंबई-४०० ०५१.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०१.१०.२०२४**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित(व्ही.सी. माध्यमाद्वारे उपस्थित) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि.२३.०९.२०२४ रोजी नोटीस प्राप्त) |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित ------"-------- |

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०४.०८.२०२१ | २३.०८.२०२१/०९.११.२०२१ | ०६.१२.२०२१ | - |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २१.०३.२०२२ रोजीच्या अर्जान्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

आजच्या सुनावणीस अपिलार्थी व्ही. सी. माध्यमाद्वारे उपस्थित होते. तथापि, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी कोणतीही सूचना न देता अनुपस्थित आहेत.

या प्रकरणी कोणतेही आदेश पारीत करण्यापूर्वी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक आहे. म्हणून आयोग पुढील आदेश देत आहे:

### आदेश

**जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस ते का उपस्थित राहू शकले नाहीत, याबाबतच्या लेखी खुलाशासह दिनांक २०.११.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता सुनावणीस उपस्थित रहावे.**

**मुंबई**
**दिनांक : ०४.१०.२०२४**

State Information Commission Greater Mumbai

(डॉ. प्रदीप व्यास)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

**अपील क्र. MHSICMU/२०२२/M/००११०५**
**अपिलार्थी श्री. सय्यद जबीयोदीन जकीयोद्दीन**
**सुनावणी दिनांक : २५.११.२०२४ (In continuation of order dt ०४.१०.२०२४)**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित(व्ही.सी.माध्यमाव्दारे) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २१.०३.२०२२ रोजीच्या अर्जान्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही व माहिती पुरविली नाही असे कारण नमुद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र दि. २३.०८.२०२१ व जन माहिती अधिकारी, गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई यांचे पत्र दि. ०९.११.२०२१ संलग्न केले आहेत.

अपिलार्थी यांनी दि. ०४.०८.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार शासनाच्या २ टक्के स्वेच्छाधिकारातील सदनिका वाटपाबाबत ५ मुद्यांबाबत माहिती विचारली होती. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी माहितीचा अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६(३) अन्वये जन माहिती अधिकारी, गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई यांच्याकडे हस्तांतरीत करुन अपिलार्थींना कळविले. जन माहिती अधिकारी, गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई यांनी दि. ०९.११.२०२१ अन्वये अपिलार्थींना मुद्देनिहाय माहिती कळविली. अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. ०६.१२.२०२१ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश अभिलेखावर उपलब्ध नाहीत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी (व्ही.सी. माध्यमाव्दारे), जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून अपिलार्थी यांनी त्यांना माहिती अधिकार अधिनियम अंतर्गत प्राप्त म्हाडाचे पत्र दि. ०७.०१.२०१० च्या अनुषंगाने त्या पत्रात नमुद शासन स्वेच्छा निर्णयाखालील आरक्षित सदनिकांपैकी ज्या सदनिकांचे वाटप झालेले आहे त्याविषयी माहिती मिळण्याची विनंती केली. तसेच त्यांनी आयोगास निवेदन केले की, जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. ०९.११.२०२१ मध्ये असे कळविण्यात आले आहे की, सन- २००८ ते २०१० पर्यंतचे अभिलेख उपलब्ध नसल्याने माहिती देणे शक्य नाही. परंतु, अभिलेख का उपलब्ध नाहीत याबाबत काही भाष्य करण्यात आले नाही. सदरचे अभिलेख सार्वजनिक अभिलेख असल्याने जर अभिलेख गहाळ झाला तर संबंधीतावर नियमानुसार गुन्हा दाखल करण्याची मागणी अपिलार्थींनी केली. जन माहिती अधिकारी यांनी दि. ०७.०१.२०१० च्या पत्रामध्ये नमुद सदनिकांपैकी जर काही सदनिका शासन स्वेच्छा निर्णयाखाली वाटप करण्यात आली असेल तर त्या विषयी माहिती उपलब्ध करुन देण्याचे मान्य केले. त्यासाठी त्यांनी १५ दिवसांची मागणी केली. आयोगाच्या अभिलेखावरील म्हाडाचे पत्र दि. ०७.०१.२०१० उपस्थित जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन देण्यात आले.

..२/-

जन माहिती अधिकारी यांनी दि. ०७.०९.२०२० रोजीच्या पत्रात नमुद राखीव ठेवण्यात आलेले सदनिकांपैकी वाटप करण्यात आलेल्या सदनिका ज्या अटी व शर्तीवर वाटप करण्यात करण्यात आले आहे व वाटप झालेले लाभार्थींचे नाव सदनिका क्रमांकासह अपिलार्थींना आदेशप्राप्तीच्या १५ दिवसांत नोंदणीकृत टपालाने निशुल्क उपलब्ध करुन द्यावे. तसेच दि. ०९.११.२०२१ मध्ये मुद्दा क्र. १ मध्ये नमुद उत्तर की, सन- २००८ ते २०१० पर्यंतचे अभिलेख उपलब्ध नसल्याने माहिती देणे शक्य नाही याबाबत खुलासा करावा. जर सदर अभिलेख कायमस्वरुपी ठेवण्याचे असेल व नष्ट व गहाळ झाले असेल तर महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीच्या अनुपालन अहवालासह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे.

**आदेश**

**१) जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.**

**२) सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ०३.०१.२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : २६.११.२०२४**